प/35 पाने

महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवात
स्व. राजकपूर यांच्या नांवाने पुरस्कार देण्या-
बाबतच्या कार्यनियमावलीस मंजूरी देणेबाबत...

महाराष्ट्र शासन

समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्र. राकपु-१०९८/प्र.क्र.४९६/सां.का. - २.

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक: २९ नोव्हेंबर, १९९९.

वाचा:- संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक: सांकास/१४३७/दिनांक १५ डिसेंबर, १९९८.

शासन निर्णय:- स्वर्गीय राजकपूर यांच्या नांवाने प्रतीवर्षी हिन्दी चित्रपट क्षेत्रास उत्कर्षासाठी ज्यांनी दिर्घकाळ आपले आयुष्य घालविले आहे तसेच चित्रपट सृष्टीत आपल्या अभिनय, संगीत, निर्मिती, दिग्दर्शन इ. अष्टपैलू गुणांनी त्या क्षेत्रात उत्कृष्ठ कामगिरी केली अशा एका व्यक्तिस रु. १.०० लाख रोख रक्कम " स्व. राजकपूर पुरस्कार " म्हणून देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. विचारांती शासन या शासन निर्णयान्वये दरवर्षी अशा प्राप्त व्यक्तिस "स्व. राजकपूर पुरस्कार" देण्यास मंजूरी देत आहे. त्याच-प्रमाणे सदर पुरस्कार देण्यासाठी तसेच मान्यवर व्यक्तिंची निवड करण्यासाठी या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" मधील नियमांनाव परिशिष्ट "ब" नुसार पुरस्कार रक्कमेसह पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यासाठी येणाऱ्या रु. १,२५,०००/- [ रुपये एक लाख पंचवीस हजार फक्त ] खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सदर पुरस्कार महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवामध्ये आयोजित करण्यात यावा.

२. यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास या संबंधिच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच पुरस्कार निवड समितीने निवड केलेल्या व्यक्तिस पुरस्कार प्रदान करण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे अधिकार संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना देण्यात येत आहेत.

३. यासाठी परिशिष्ट "ब"नुसार येणारा खर्च " २२०५ कला व संस्कृति - १०२ कला व संस्कृती यांचे प्रचालन ( [illegible] ) [illegible] ) मराठी चित्रपट महोत्सव-

२०इतर खर्च
[ २२०५ ०७,३४/] मागणी क्र. एन. ४ या लेखाशिर्षाखाली त्या त्या वर्षात करण्यात येणा-या तरतूदीतून भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या सल्ल्याने व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र. पृ.क्र. ८०१/९९/व्यय-११, दिनांक १६.१०.१९९९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ पृ. ता. गौड ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-१, [ लेखाव अनुज्ञेयता/लेखापरिक्षा ] मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
वित्त विभाग, (व्यय-११,) मंत्रालय, मुंबई.
सामान्य प्रशासन विभाग, (का. ३३,) मंत्रालय, मुंबई.
कक्ष अधिकारी, (सां. का-१,) स.क.सां.का.व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती, का. सां. का-२.

## परिशिष्ट "अ"

प/३७

शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक: राकपु-१०९८/प्र.क्र. ४९६/सां.का-२/दिनांक २९.११.१९९९ चे सहपत्र हिंदी चित्रपट क्षेत्रात आयुष्यभर उल्लेखनिय कार्य केलेल्या अभिनय, संगीत, निर्मिती, दिग्दर्शन इ. अष्टपैलू गुणांनी चित्रसृष्टीत सन्मानित झालेल्या एका व्यक्तीस स्व. राजकपूर पुरस्कार देण्याच्या योजनेचे नियम:-

1) प्रस्तावना:- १] चित्रपटसृष्टीचा विस्तार मोठ्या प्रमाणात वाढला असून त्यामध्ये हिंदी चित्रसृष्टीचाही मोलाचा वाटा आहे. अभिनय, निर्मिती, दिग्दर्शन, संगीत इत्यादी क्षेत्रातील मराठी हिंदी चित्रसृष्टीत संपूर्ण आयुष्य व्यतीत केले आहे, अशा अनेक मान्यवर व्यक्ती आहेत. परंतु सध्या एकच पुरस्कार देण्यांत येत असल्यामुळे त्यांच्या कलेचा सन्मान करता येत नाही. त्यामुळे अनुक व्यक्ती पुरस्कारापासून वंचित राहतात.

२] महाराष्ट्रातील रहिवासी असलेल्या व मराठी चित्रपट क्षेत्रात आयुष्यभर उल्लेखनिय कार्य केलेल्या अभिनय, निर्मिती, संगीत दिग्दर्शनाने जनमानसामध्ये ख्यातनाम झालेल्या व चिरकाळ स्मरणांत असलेल्या सन्मानाने पुरस्कारित झालेल्या एका व्यक्तीस चित्रपती व्ही. शांताराम यांच्या नावे प्रतिवर्षी पुरस्कार देण्यात येतो.

३] शासनाने आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय ख्याती प्राप्त अभिनेता, अभिनेत्री दिग्दर्शक, निर्माता अशा अष्टपैलू व्यक्तीस/स्व. राजकपूर यांच्या नावाने प्रतिवर्षी "राजकपूर" पुरस्कार देण्याचे ठरविले आहे.

2) संक्षिप्त शिर्षक आणि व्याप्ती. :- महाराष्ट्रातील हिंदी चित्रसृष्टीत आयुष्यभर उल्लेखनिय कार्य केलेल्या आपल्या अभिनय, संगीत निर्मिती, दिग्दर्शन इत्यादि अष्टपैलू गुणांनी चित्रसृष्टीत सन्मानित झालेल्या एका व्यक्तीस द्यावयाच्या पुरस्कारास "राजकपूर पुरस्कार" असे संबोधण्यात येईल.

कृपया मागे पहा...२/

३] उद्दिष्ट:- आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारांची संख्या फार कमी असते. महाराष्ट्रातील अनेक ख्यातनाम कलाकार, संगीतकार, निर्माते दिग्दर्शक इत्यादींची पात्रता असून राष्ट्रीय पुरस्कारापासून वंचित राहतात. चित्रपट क्षेत्रात आपल्या अभिनय, निर्मितीस व दिग्दर्शनाने अलौकीक किर्ती मिळाविलेल्या व संपूर्ण आयुष्यभर कलेची सेवा केलेल्या आंतरराष्ट्रीय किर्तीच्या राजकपूर यांच्या नांवे पुरस्कार देऊन चित्रपट क्षेत्राच्या विकासाला उत्तेजन देणेच्या उद्देशाने अशा कलाकार निर्माते यांचा या पुरस्कारासाठी विचार करण्यांत येईल.

४] पुरस्काराचे स्वरूप:- पुरस्कारामध्ये समाविष्ट बाबी:-

१] रु. १.०० लाख रोख [ धनाकर्षाद्वारे ]

२] शाल-श्रीफळ

३] स्मृती चिन्ह, ४] मानपत्र

A

५] पुरस्काराचे क्षेत्र:- हिंदी / चित्रपट क्षेत्रातील फक्त एका व्यक्तीची दरवर्षी पुरस्कारासाठी निवड करण्यांत येईल.

६] पुरस्कारासाठी पात्रता:- हिंदी / चित्रपट क्षेत्रात प्रदीर्घ काळ उल्लेखनिय कार्य करुन ज्यांनी चित्रपट क्षेत्रात राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय ख्याती मिळविली आहे. व ... अशी मोलाची भर घातली आहे अशा मान्यवर ज्येष्ठ व सर्वमान्य/राज्याला गौरव प्राप्त करुन देणारी व्यक्ती पुरस्कारासाठी पात्र असतील [निर्माता, कला, दिग्दर्शक इ.]

२] असा कलाकार आयुष्यभर कार्यरत असणारा असावा.

३] कलाकाराची त्याच्या कलाक्षेत्रातील कर्तत्वाची जेष्ठता प्रसिध्द असावी.

४] वयोमर्यादा ६५ वर्षे पेक्षा कमी वय नसावे.

५] पुरस्कारासाठी निवड करावयाची व्यक्ती महाराष्ट्र राज्यातील किमान २५ वर्षे वास्तव्य असलेली असावी.

कृपया पुढे पहा..३.

प/39 प

६] कोणत्याही व्यक्तीस त्यांच्या आयुष्यात एका वेळा पेक्षा जास्त वेळा ह्या पुरस्कारासाठी पात्र समजण्यांत येणार नाही.

७] हा पुरस्कार प्रदान करण्यासाठी जात, धर्म, लिंग ह्या गोष्टींचा विचार केला जाणार नाही.

८] एखादया कलेसाठी शासनाकडून पूर्वी पुरस्कार प्राप्त झाला आहे. अशी व्यक्ती पुरस्कारासाठी पात्र असणार नाही.

७] निवडसमिती :- राजकपूर पुरस्काराची निवड करण्यासाठी चित्रपट क्षेत्रातील राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय किर्तीच्या मान्यवर व्यक्ती निवड समितीवर नेमण्यांत येईल. सदर निवड समिती २ प्रकारामध्ये असेल.

१] पहिली निवड समिती ही सात अशासकीय सदस्यांची असेल. त्यांच्यापैकी जेष्ठ व्यक्ती समितीचा अध्यक्ष नियुक्त म्हणून नियुक्त करण्यात येईल. या समितीची मुदत या आदेशाच्या दिनांकपासून ३ वर्षासाठी किंवा यासंबंधी शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तो पर्यंत असेल.

२] अंतिम निर्णय समिती ही खालीलप्रमाणे नेमण्यांत येईल.

[१] मा. मंत्री, सां. कार्य, अध्यक्ष.

[२] मा. राज्यमंत्री, सां. कार्य, उपाध्यक्ष.

[३] सचिव [सां. का. ] सदस्य

[४] संचालक [सां. का. ] सदस्य सचिव चित्रपट क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींतून अशासकीय सदस्यांची पहिल्या निवड समितीवर अध्यक्ष/सदस्य नियुक्त करण्याचे अधिकार मा. मंत्री [सां. का. ] यांचे राहतील.

नावांची शिफारस करण्याची पध्दती :- १] कलाकारांची निवड चित्रपट क्षेत्रातील मान्यवर [illegible] यांच्याकडून शिफारस करण्यात आलेल्या नावातून सर्वसाधारणपणे करण्यांत येईल. तथापि, संस्था/संघटनांची शिफारस केलेला [illegible] पुरस्कारासाठी निवडले गेले पाहिजे. असे बंधन निवड समितीवर राहणार नाही.

२] या संस्था/संघटना प्रत्येक चित्रपट क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींच्या नावाची शिफारस करतील व त्या व्यक्तीची चित्रपट क्षेत्रातील उल्लेखनिय कामगिरी बद्दल तपशीलवार माहिती छायाचित्र यासह " गोपनीय" असे पाकिटावर नमूद करुन शिफारसपत्र संचालक, सांस्कृतिक कार्य,

मुंबई, यांना विहित केलेल्या तारखेपूर्वी त्यांच्या कार्यालयात पाठवतील.

३] संचालक, सांस्कृतिक कार्य या संदर्भात मान्यवर संस्था/संघटना यांच्याशी प्रथमत पत्रव्यवहार करतील. पत्र पाठवून व्यक्तींची नावे मागवतील.

४] चित्रपट क्षेत्रातील कोणत्याही संस्था/संघटनांकडून शिफारस न आल्यास संचालक, सांस्कृतिक कार्य हे स्वत:च पात्र व्यक्तींची नावे पुरस्कारासाठी समितीकडे शिफारस करतील.

आलेल्या शिफारशींची

९] तपासणी :-

१] संस्था/संघटनांकडून शिफारस करुन आलेल्या नावांची तपासणी करुन संचालक, सांस्कृतिक कार्य हे नियमानुसार व्यक्तींची सूची तयार करुन नियुक्त अशासकीय समिती सदस्यांपुढे ठेवतील.

२] सदर निवड समिती एका व्यक्तीची निवड करील.

३] आलेल्या शिफारशी कोणतेही कारण न देता नाकारण्याचे अधिकार शासनाकडे राहतील.

४] अशासकीय निवड समिती सदस्यांनी निवड केलेल्या व्यक्तिंच्या नावास मा. मंत्री, सां. का. यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेली निवड समिती अंतिम मान्यता देईल.

५] कोणत्याही वर्षी पुरस्कारासाठी पात्र व्यक्ती उपलब्ध आहे किंवा नाही त्याबद्दल अंतिम निर्णय पुरस्कार समितीच्या सल्ल्याने शासन घेईल.

कृपया पुढे पहा..५.

५/५।



१०] पुरस्कार जाहिर करण्याचे प्राधिकार:- अ] राजकपूर पुरस्कारासाठी निवड समितीची शिफारस महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाकडे पाठविण्यांत येईल व त्यास शासनाने मान्यता दिल्यानंतर पुरस्कार जाहिर करण्यांत येईल.

ब] शासनाचा निर्णय अंतिम निर्णय असेल व शासनाच्या अशा निर्णयाविरुध्द कोणतेही अपील करण्याचा कोणाही अधिकार असणार नाही.

क] शासनास एखाद्या व्यक्तीस देण्यांत आलेला पुरस्कार योग्य कारण दर्शवून रद्द करता येईल आणि तसे घडल्यास तो पुरस्कार मिळालेली व्यक्ती सदर पुरस्कार संचालक, सांस्कृतिक कार्य, मुंबई यांना परत करतील.

११] पुरस्काराचे वितरण:- सदर पुरस्कार महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सव/पारितोषिक वितरण समारंभामध्ये देण्यांत येईल.

----***----